B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ( (SJIF) -7.675, Issue NO, 243 (CCXLIII)
ISSN : 2278-9308
September 2020

# संत साहित्यातील लोकतत्त्वीय विचार

प्रा. मोरे भास्कर निवृत्ती
दादा पाटील महाविद्यालय, कर्जत, जिल्हा-अहमदनगर

- **प्रास्ताविक -**

मध्ययुगीन कालखंडात महाराष्ट्रात संत ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ, तुकाराम असे अनेक संत होऊन गेले. या सर्वच संतांनी प्रचंड स्वरुपाची साहित्य निर्मिती केली आहे. या साहित्याचा वाड्.मयीन आणि धार्मिक अंगाने विशेष करून अभ्यास झालेला आहे. या संत साहित्यातील लोकतत्त्वीय विचारही अत्यंत महत्त्वाचे आहेत. संत हे लोकातून उदयास आलेले असल्यामुळे त्यांनी आपले विचारानुभव लोकांपर्यंत पोहचविण्याच्यादृष्टीने त्यांनी आपल्या कथा, कीर्तन, साहित्य वा प्रवचनातून प्रयत्न केले. महाराष्ट्रातील लोकांची नव विचारांच्यादृष्टीने जडण-घडण करण्याचा प्रयत्न त्यांनी केला. संतांनी लोकोद्धाराचा वसा घेतला होता. लोकोद्धाराचे कार्य करताना त्यांनी लोकसंस्कृतीचे सामर्थ्य ओळखून त्यानुसार लोकांशी संवाद साधण्याचा प्रयत्न केला. हा विचार प्रस्तुत शोधनिंबधातून मांडण्याचा माझा छोटासा प्रयत्न आहे. यासाठी 'लोक' म्हणजे काय? 'लोकतत्त्व' म्हणजे काय? संतांनी आपल्या साहित्यातून लोकतत्त्वीय दृष्टीने मांडलेले विचार या दृष्टीने या शोधनिबंधाची मांडणी करण्याचा माझा प्रयत्न आहे.

- **'लोक' म्हणजे काय? -**

मनुष्य हा आपल्या संरक्षणासाठी व दैनंदिन गरजा भागविण्यासाठी सामुहिक जीवन जगतो. असे जीवन जगताना मानवी समुहाला काही नीतिनियम तयार करावे लागतात. त्याशिवाय दैनंदिन जीवन सुव्यवस्थितपणे जगता येत नाही. त्यातून मानव समुहाची एक संस्कृती निर्माण होते. अशा संस्कृतीच्या आधीन राहून जगणाऱ्या मानवी गटाला 'लोक' असे म्हणतात. 'शब्दकोशात 'लोक' या शब्दाचा अर्थ भुवन, वसतिस्थान, जन, प्रजा, परकी माणसे, जाती असा दिला आहे'[१] यातून एक गोष्ट लक्षात येते की, विशिष्ट परंपरेने, नातेसंबंधाने, संस्कृतीने एकत्र वसाहत करून राहणारा मानव समूह म्हणजे 'लोक' किंवा एकत्र वस्तीला असलेली प्रजा, विशिष्ट रीतिरिवाज असलेली मानव जात या अर्थाने 'लोक' या शब्दातील अर्थ आपल्या लक्षात येतो. हे लोक म्हणजे धर्म, पंथ, वंश, प्रदेश वा भाषिक अशा विशिष्ट गटाचा मानव समूह असतो.

भारतीय संविधानातील प्रास्ताविकेत 'लोक' हा शब्द पुढील प्रमाणे वापरला आहे. "आम्ही भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य घडविण्याचा व त्याच्या सर्व नागरिकास : सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय, विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा व उपासना यांचे स्वातंत्र्य, दर्जाची व संधीची समानता, निश्चितपणे करून देण्याचा आणि सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता आणि एकात्मता यांचे आश्वासन देणारी बंधुता करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून, आमच्या संविधान सभेस आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर १९४९ रोजी याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वतः प्रत अर्पण करत आहोत."[२] या भारतीय संविधानातील प्रास्ताविकेत भारतातील संपूर्ण मानव समाज म्हणजेच 'लोक' असा विचार आलेला आहे. शिवाय सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष गणराज्य घडविण्याचा विचार व्यक्त झालेला आहे. संतांची विचारसरणी या प्रास्ताविकेतील विचारसरणीशी सुसंगत आहे, असे म्हटल्यास चुकीचे ठरू नये.

- **'लोकतत्त्व' म्हणजे काय? -**

'लोक' आणि 'तत्त्व' या दोन शब्दांचे एकत्रिकरण करून 'लोकतत्त्व' हा शब्द तयार केला आहे. यातील 'लोक' या शब्दाचा अर्थ अगोदर आपण पाहिला आहेच. यातील 'तत्त्व' या शब्दाचा अर्थ शब्दकोशात 'सत्य' , 'तात्पर्य' असा दिला आहे. प्रत्येक मनुष्याचे वा मानव समुहाचे काही विश्वास असतात. एक विचारविश्व असते. त्याच्याशी संबंधित काही आदर्श असतात. त्यातून त्यांची जीवनदृष्टी निर्माण होते. त्याच्या पूर्ततेसाठी स्वतःच्या वर्तुणुकीसंदर्भात व इतरांकडून काही



Scanned with CamScanner

अपेक्षा असतात. यातूनच मनुष्याचे स्वत:चे तसेच दुसऱ्याच्या आचरणांसंबंधीचे काही मानदंड, मापदंड निर्माण होतात. हे मापदंड किंवा मानदंड वा नियम म्हणजेच 'तत्त्व' होय. याचा अविष्कार कर्तव्याच्या रुपात होतो. अशी तत्त्वे म्हणजेच आचरण विषयक एक विचारधारा असते. ही विचारधारा मानवी समाजाचे नियमन करते. समाजाला सुघटित वळण लावण्यासाठी अशा विचारधारांची मोठी गरज असते. त्यातून मानवी जीवनाला एक स्थिरता प्राप्त होते. जिथे अशा स्वरुपाची तत्त्वनिष्ठता संपते, तिथे संस्कृती संपते. कुटुंब, समाज, न्याय, धार्मिक सुव्यवस्था, आर्थिक सुव्यवस्थेसाठी अशा तात्त्विक विचारांची गरज असते. हे तात्त्विक विचार लक्षात घेऊन समाज मनाची जडण-घडण करण्याचा प्रयत्न मध्ययुगीन कालखंडात संतांनी केलेला दिसतो.

- **संतांचा मराठी साहित्यातून प्रकट होणारा लोकतत्त्वीय विचार-**

मध्ययुगीन मराठी संत साहित्याची निर्मिती ही लोकाभिमुख भूमिकेतूनच झालेली दिसते. लोकांसाठी साहित्य निर्मिती करताना संतांनी लोकभाषेचा वापर केला समाजातील पारंपरिक लोकाभिव्यक्तीच्या माध्यमातून साहित्य निर्मिती केली. संत एकनाथांची भारुडे याचे उत्तम उदाहरण आहे. याशिवाय संतांनी कीर्तन, प्रवचन, कथाकथन, गीतगायन अशा तत्कालीन रूढ लोकप्रकटन संस्थांचा आधार घेतला आणि त्याला अनुरूप अशी वाड्.मय निर्मिती केली. लोकभाषेतून, लोकमाध्यमांच्या आधारे, लोकाभिमुख भूमिकेतून संतांनी आपली वाड्.मय निर्मिती केली असल्यामुळे त्यातून लोकतत्त्वे अविष्कृत झाली आहेत.

तेरावे शतक हा मध्ययुगीन मराठी साहित्याच्या संदर्भातील अतिशय महत्त्वाचा कालखंड आहे. या काळात महाराष्ट्रातील सांस्कृतिक सामाजिक आणि धार्मिक जीवनावर परिणाम करणारे दोन महत्त्वपूर्ण संप्रदाय उदयास आले. महानुभाव संप्रदाय व वारकरी संप्रदाय हे ते दोन संप्रदाय होत. या दोन्ही संप्रदायांना आधारभूत असलेले ग्रंथ एकच आहेत. दोहोंनाही भगवद्गीता, भागवत हे ग्रंथ प्रमाण वाटतात. श्रीचक्रधर हे महानुभाव संप्रदायाचे संस्थापक, तर संत नामदेव वारकरी संप्रदायाचे एक श्रेष्ठ प्रचारक. या दोघांचाही अधिकार त्या त्या संप्रदायात मोठा आहे. दोघांनीही लोकोद्धाराचे कार्य हेच आपले जीवनध्येय मानून कार्य केले. महानुभाव संन्यासी अस्पृश्यता पाळत नाहीत. त्यामुळे या पंथात स्त्रिया व शूद्र यांना दीक्षा घेण्याचा अधिकार आहे. महानुभाव शिष्यांनी नुसते वैराग्याचे प्रदर्शन न करता केवळ 'मनुष्यमात्र होऊनी असावे. वैराग्य ज्ञानयुक्त असावे. अहिंसा हे महानुभावीयांचे महत्त्वाचे तत्त्व, अहिंसेचे पालन अशा रीतीने करावे की, तुमचेंनि मुंगी रांड न हो द्यावी : आपणास 'मारिता पुजोता समानचि' असावा'[3] हे लोकतत्त्वीय विचार महानुभावीय वाड्.मयात येतात. 'लीळाचरित्र', 'दृष्टान्तपाठ' या महानुभावीय ग्रंथातील भाषा लोकजीवनातूनच निवडलेली आहे, कारण त्यातील तत्त्वज्ञान सर्वसामान्यांना कळण्यासाठी, लोकभाषेचा वा घरगुती भाषेचा वापर केलेला आढळतो. महानुभावीय पंथाचे आराध्य दैवत श्रीकृष्ण हे आहे. त्यामुळे श्रीकृष्ण चरित्रातील उदाहरणे वाड्.मयात आलेली दिसतात. श्रीकृष्ण हा लोकांचा उद्धारकर्ता, गोप-गोपींचा सखा, मित्र आहे. त्याच्या बाळक्रीडांचे वर्णन या काळातील वाड्.मयात दिसते. वारकरी संप्रदायातही बरेचसे वाड्.मय श्रीकृष्ण चरित्रपर वा वर्णनपर दिसते. कृष्णकथा या जणू या काळातील साहित्याचा प्राणच आहेत. दया, क्षमा, शांती, अहिंसा, समता व मानवता या लोकजीवनास उद्धारक ठरणाऱ्या अशा तत्त्वांचे दर्शन संत साहित्यातून आढळते. संत ज्ञानदेव, व नामदेवांच्या प्रभावळीतील संत एकनाथ, गोरा कुंभार, सावतामाळी, नरहरी सोनार, चोखा मेळा, सेना न्हावी, परिसा भागवत, विसोबा खेचर, मुक्ताबाई, जनाबाई, या सर्वच संतांच्या रचनेतून लोकतत्त्वीय विचार स्पष्ट झालेले आहेत.

भागवत धर्माचा पाय रचणारे पहिले संत म्हणजे संत ज्ञानेश्वर. 'ज्ञानेश्वरी', 'अमृतानुभव' यासारख्या ग्रंथांमधून तत्त्वज्ञानाचा मोठा ठेवा त्यांनी जगाला उपलब्ध करून दिला. वारकरी संप्रदायात जाती धर्मांची सर्व बंधने मोडीत काढून सर्व संत व भक्त याना संप्रदायाच्या भगव्या पाताकाखाली एकत्र आणले. हा संप्रदाय सर्व जाती धर्मातील लोकांसाठी खुला आहे, असे सांगून आठरापगड जातीतील लोक एकत्र आले. या संप्रदायात गरीब-श्रीमंत, उच्च-नीच, स्त्री-पुरुष, वर्ण-जात, लिंग, वंश याविषयी कुठलाच मज्जाव नव्हता तर

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ((SJIF) -7.675, Issue NO, 243 (CCXLIII)
ISSN : 2278-9308
September 2020

'या रे सारे लहानथोर याती भलते नारी नर'

असे सर्वांना एकत्र करत पंढरपूरच्या चंद्रभागेच्या वाळवंटात वारकरी संप्रदयाच्या भगव्या पताकाखाली एकत्र येऊन आध्यात्मिक लोकशाही संत ज्ञानदेवांनी निर्माण करून वारकरी संप्रदायाच्या विचारधारेचा लोक वा समाज एकत्र केलेला दिसतो. त्यांच्यात सामाजिक एकात्मता रुजवलेली दिसते. ज्ञानदेवांचे 'पसायदान' हे तर व्यापक मानवतावादाचे प्रतीक आहे. लोकभाषेचा वापर करून वेदांतविचार किंवा जीवनातील तत्त्वज्ञानाचे सार ज्ञानदेवांनी समाजासमोर मांडले. त्यांचे एकूण सर्व साहित्यातील विचार हे लोक मानसाच्या मनाची धारणा करणारे लोकतत्त्वीय विचारांचे दर्शन घडवितात असे म्हटल्यास ते चुकीचे ठरू नये.

संत एकनाथांच्या रचना या लोकगीतांच्या धरतीच्या आहेत. त्यातून लोकसंस्कृतीचे दर्शन तर घडतेच, परंतु त्याचबरोबर लोकमानसही कळते. रीतिरिवाज, लोकविश्वास, लोकभ्रम, व्रतवैकल्ये, सणवार, शकून-अपशकून या संदर्भातील लोकजीवनातील उदाहरणे देऊन लोकतत्त्वीय विचार सांगण्यात संत एकनाथ हे यशस्वी झालेले आहेत. बहुजनांसाठी, अज्ञजनांसाठी त्यांना समजेल, रुचेल आणि पचेल अशा शब्दांत नाथांनी भारुडांची रचना करून नित्याच्या जीवनातील दाखले देऊन समाजाला त्यांनी प्रबोधनपर विचार दिले. तत्कालीन समाजात नित्य आढळणारी ज्योतिषी, कोल्हाटी, डोंबारी, भुत्या, वैदू, दरवेशी, फकीर, जागल्या, वासुदेव अशी खेड्यातील माणसे लोकांच्या परिचयातील होती. या माणसांची वृत्ती-प्रवृत्ती यांचे सुरेख चित्रण त्यांच्या भारुडातून आढळते. आध्यात्माचा धागा या भारुडात जरी असला, तरी कौटुंबिक आणि सामाजिक सुधारण्याची लोकतत्त्वीय विचारदृष्टी त्यातून प्रकटताना दिसते. माणसाने मानवतावाद सोडू नये, आपली नाती गोती सांभाळावीत, इमान सोडू नये, अहंकार करू नये असा व्यावहारिक उपदेश भारुडातून सांगताना लोकजीवन विषयक नैतिक मूल्ये वा तत्त्वविचार त्यातून प्रकटतो.

संत तुकारामांची अभंगवाणी तर लोकतत्त्वीय विचारांची जणू खाणच आहे. दीन दुर्बलांनी हरी कथेचे सेवन करावे, सन्मार्गाने वागावे, भक्तीच्या क्षेत्रात कुल, जाती, वर्ण हे प्रमाण नसून 'गुणांचे कारण अंगी वसे', नीतियुक्त आचरण आण शुद्ध भाव, शुद्ध अंतःकरण येथे महत्त्वाचे असते.

'अंतरी निर्मळ वाचेचा रसाळ
त्याचे गळा माळ असो नसो'[४]

असे सांगून वारकरी संप्रदायापुरते तरी संत तुकारामांनी जातिभेद मोडून काढले. सामाजिक समतेच्या उद्धाराचा मार्ग त्यांनी दाखविला. समाज जीवनाच्या वाटा त्यांना उजळायच्या होत्या. बहुजनांच्या धर्मश्रद्धेला तत्त्वचिंतनाची आणि चित्तशुद्धीची जोड त्यांना द्यायची होती. म्हणून आपल्या अभंग रचनेतून जीवनाचे सार सांगताना ते लिहितात-

'मुलाम्याचे नाणे | तुका म्हणे नव्हे सोने |'
'शुद्ध बीजापोटी | फळे रसाळ गोमटी |'
'गाढव शृंगारिले कोडे | काही केल्या नव्हे घोडे |'

अशा तुकोबांच्या अभंगातील ओळी म्हणजे जीवनानुभवाचे सार आहेत. तात्त्विक विचारसरणीच्या दृष्टिकोनातून या अभंगांच्या ओळींची निर्मिती झाली आहे. तात्त्विक स्वरुपाचे हे खडे-रोकडे बोल असून जीवन विषयक तात्त्विक विचार त्यातून प्रकट झाले आहेत. लोक जीवनात वावरताना आपण कसे असावे या संदर्भातील लोकतत्त्वीय विचार प्रकट करताना संत तुकोबांनी लोकभाषेचा वापर केला आहे. त्यामुळे त्यांचे अभंग व त्यातील तात्त्विक विचार जनमानसाच्या हृदयात रूजून बसले आहेत. जीवनाविषयक तत्त्वाधार सांगणारे ते तत्त्वज्ञान बनले आहेत.

समर्थ रामदासांचे 'मनाचे श्लोक' व 'दासबोध' हे वाङ्‌मय तर मानवी जीवनाला मार्गदर्शक ठरावे असेच आहे. मानवी जीवनाचा असा कोणताही भाग त्यांनी शिल्लक ठेवलेला नाही की, त्यांनी जीवनाच्या अंगांना व त्याच्या तत्त्वविचारांचा स्पर्श केलेला नाही. तत्कालीन सामाजिक, धार्मिक, राजकीय, आर्थिक सांस्कृतिक अशा सर्व अंगांना त्यांच्या उपदेशवाणीचा स्पर्श झालेला दिसतो. सामाजिक क्षेत्रात विषमतामूलक जातिव्यवस्था, आर्थिक क्षेत्रात वतनदारी आणि यावर धर्मसंस्थेचे वर्चस्व अशी एकूण मध्ययुगीन कालखंडातील परिस्थिती होती. त्याचा विपरित परिणाम लोकमानसावर होत होता. अशा उद्ध्वस्त होऊ पाहणाऱ्या लोकमानसास समर्थ रामदासांच्या



Scanned with CamScanner

'मराठा तितुका मेळवावा', 'महाराष्ट्र धर्म वाढवावा |'
यासारख्या विचारांनी चैतन्य निर्माण केले.

'मना वासना दुष्ट कामा नये रे |
मना सर्वथा पापबुद्धी नको रे |
मना सर्वथा नीति सोडू नको हो |
मना अंतरी सार विचार राहो ||'[५]

असे परमार्थप्रवण, सामाजिक नीतिविषयक शुद्ध नैतिक आचरण असावे हा तत्त्वविचार लोकमानसाकडून त्यांनी अपेक्षिला आहे.

'अविद्यागुणे मानवा उमजेना |'
'भ्रमे चूकले हीत ते आकळेना |'[६]

माणसाला अविद्येमुळे यथार्थ ज्ञान होत नाही, त्यामुळे जीवनात योग्य गोष्टी उमजत नाहीत हा विचार करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन समर्थ रामदास आवर्जून सांगतात. त्यांचे 'मनाचे श्लोक' म्हणजे मानवी मनाची जोपासना करणारे खास तत्त्वविचार आहेत. यातून लोकमानस घडण्यास निश्चित हातभार लागेल असे हे विचार आहेत.

'मना चंदनाचे परि त्वां झिजावे' अशी लोकसेवेची शिकवण ते देतात. समर्थांचा 'दासबोध' हा ग्रंथ तर सामाजिक, धार्मिक, राजकीय तत्त्वविचारांचे एक विचारधनच आहे. 'प्रपंच करावा नेटका' असे सांगून निरपेक्ष, विवेकपूर्ण प्रपंच करण्याचा सर्वोत्तम सल्ला ते या ग्रंथातून देतात.

- **समारोप-**

एकूणच या शोधनिबंधातून एका वेगळ्या विचाराने, संस्कृतीने, परंपरेने बांधला गेलेला मानवगट म्हणजेच 'लोक' होत. या लोकगटात मनुष्याने स्वतःच्या तसेच दुसऱ्याच्या आचरणासंबधीचे काही मानदंड निर्माण केले, आचरण विषयक काही तत्त्वे निर्माण केली, ती तत्त्वे म्हणजेच 'लोकतत्त्वे' होत. समाज जीवनाला सुव्यस्थितपणा व स्थिरता प्राप्त होण्यासाठी या लोकतत्त्वांचा लोकांनी अंगिकार केला पाहिजे. त्यामुळे लोक मानसात वावरताना जीवन जगणे सुसह्य होईल. समाजाची मनोधारणा घडविण्यासाठी संतांचे हे विचार अत्यंत महत्त्वाचे आहेत. यादृष्टीने मध्ययुगीन कालखंडातील महानुभाव संप्रदाय, वारकरी संप्रदाय व त्यातील संत व महात्मे यांनी लोकतत्त्वीय विचार कसे मांडले, त्यामुळे समाज मनाची विशिष्ट प्रकारे मनोधारणा बनविण्यास मोठा फायदा झाला. या संत साहित्यातील लोकतत्त्वांचा अभ्यास केल्यानंतर संतांच्या असणाऱ्या लोकाभिमुख विचारांचा प्रत्यय आपणास येतो. त्याचबरोबर संत हे लोकतत्त्व विचारांचे पुरस्कर्ते होते, ते मूल्यशिक्षक होते. त्यांनी आपल्या साहित्य, कथा, कीर्तन या प्रवचनातून राष्ट्रभक्ती शिकविली. राष्ट्रीय एकात्मता शिकविली. सर्वधर्म समभाव, जातीय एकात्मता, मानवतावादी दृष्टिकोन, संवेदनशीलता, स्त्री-पुरूष समानता, सौजन्यशीलता अशी आदर्श जीवनविषयक लोकतत्त्वे शिकविण्याचा प्रयत्न सर्व संतांनी केला. त्यामुळे संत हे लोक उद्धारक ठरले आहेत हे मान्य करावे लागते.

- **संदर्भ -**

१) वा.गो.आपटे (संपादक), अनमोल मराठी शब्दरत्नाकर, प्रकाशक- मो.द. नांदुरकर, अनमोल प्रकाशन बुधवार पेठ पुणे-२, आवृत्ती १९९७, पृ. ५१२
२) रा. ज. लाटे, भारतीय शासन आणि राजकारण, पिंपळापुरे अँण्ड कं. पब्लिशर्स नागपूर, पहिली आवृत्ती जून २००३, पृ.३९
३) ल.रा. नासिराबादकर, 'प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास', फडके प्रकाशन कोल्हापूर, आवृत्ती सातवी १९९७, पृ. १७
४) तत्रैव, पृ. १३०
५) डॉ. र. रा. गोसावी (संपादक), समर्थ रामदास विरचित मनाचे श्लोक, स्नेहवर्धन पब्लिसिंग हाऊस पुणे, प्रथमावृत्ती २००५, पृ.४१
६) तत्रैव, पृ. १८०



Scanned with CamScanner